सरळसेवा प्रवेश व पदोन्नतीसाठी सुधारित बिंदू नामावली विहित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांकः- 29 मार्च, 1997.

वाचाः- 1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दिनांकः 26 जुलै, 1995.
2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब, दिनांकः 15 सप्टेंबर, 1995.
3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब, दिनांकः 15 फेब्रुवारी, 1996.

**प्रस्तावना :-** उपरोक्त दिनांकः 26 जुलै, 1995 व दिनांकः 15 सप्टेंबर, 1995 च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या 200 बिंदु व 50 बिंदू नामावल्या मागे घेण्यात येत असल्याची घोषणा, दिनांकः 19 डिसेंबर,1995 रोजी विधान परिषदेत झालेल्या चर्चेच्या वेळी शासनातर्फे करण्यात आली. त्या अनुषंगाने, उपरोक्त क्रमांक-3 येथील दिनांक 15 फेब्रुवारी, 1996 च्या शासन निर्णयान्वये, घोषणेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांकः 19 डिसेंबर, 1995 पासून, 200 बिंदू व 50 बिंदू नामावल्या मागे घेण्यात आल्या. मात्र दरम्यानच्या काळात कामकाजाची अडचण होऊ नये म्हणून तात्पुरती 200 बिंदू/50 बिंदू नामावली विहित करण्यात आली. बिंदू नामावली सुधारित करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता.

**शासन निर्णय :** सरळसेवा प्रवेशासाठी व पदोन्नतीसाठी बिंदू नामावल्या सुधारित करण्याच्या प्रश्नासंदर्भात शासनाने मा. उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार सरळसेवा प्रवेशासाठी सुधारित 100 बिंदू नामावली व पदोन्नतीसाठी सुधारित 50 बिंदू नामावली याद्वारे विहित करण्यात येत आहेत. सुधारित बिंदू नामावलीचा नमुना सोबत जोडला आहे.

2. या निर्णयाच्या दिनांकापूर्वी ज्या प्रकरणी कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. मात्र, यापुढे सरळसेवा भरती व पदोन्नतीसंदर्भात, सोबतची सुधारित बिंदू नामावली अनुसरण्यात यावी. विद्यमान बिंदू नामावलीनुसार यापूर्वी ज्या क्रमांकापर्यंतचे बिंदू वापरले आहेत, त्यापुढील बिंदू पासून सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करण्यात यावा. मात्र त्यापूर्वीचा अनुशेष असल्यास सरळसेवा भरती/पदोन्नती प्रसंगी विचारात घेण्यात यावा. विमुक्त जाती/ भटक्या जमाती करिता सरळ सेवेसाठी "अ", "ब", "क" व "ड" या प्रवर्गातील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय (Internally transferable) राहील.

3.मंत्रालयीन विभागांनी,सरळसेवा भरती व पदोन्नतीच्या वेळी, या सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करावा. तसेच त्यांच्या नियंत्रणाखाली सर्व शासकीय कार्यालयांना, यासंदर्भात उचित सूचना देण्यात याव्यात. निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादीमध्ये, हे आदेश लागू करण्यासंबंधी संबंधीत मंत्रालयीन विभागांनी योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू. बुध्दीराजा,
सचिव (सेवा).

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

कृ.मा.पं.

मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/ अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

पत्रानं

सरळसेवा भरतीसाठी 100 बिंदु नामावली.

| अनुक्रमांक | वर्ग | अनुक्रमांक | वर्ग. |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 36. | खुला |
| 2. | अनुसूचित जमाती | 37. | अनुसूचित जाती |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 38. | खुला |
| 4. | भटक्या जमाती (ब) | 39. | इतर मागास वर्ग |
| 5. | इतर मागास वर्ग | 40. | खुला |
| 6. | खुला | 41. | विमुक्त जाती (अ) |
| 7. | भटक्या जमाती (क) | 42. | खुला |
| 8. | खुला | 43. | अनुसूचित जाती. |
| 9. | इतर मागास वर्ग | 44. | खुला |
| 10. | खुला | 45. | इतर मागास वर्ग |
| 11. | भटक्या जमाती (ड) | 46. | खुला |
| 12. | अनुसूचित जाती | 47. | भटक्या जमाती (ब) |
| 13. | खुला | 48. | खुला |
| 14. | खुला | 49. | इतर मागास वर्ग |
| 15. | विशेष मागास वर्ग | 50. | खुला |
| 16. | खुला | 51. | अनुसूचित जाती. |
| 17. | इतर मागास वर्ग | 52. | खुला |
| 18. | खुला | 53. | अनुसूचित जमाती |
| 19. | इतर मागास वर्ग | 54. | खुला |
| 20. | खुला | 55. | इतर मागास वर्ग. |
| 21. | अनुसूचित जाती | 56. | खुला |
| 22. | खुला | 57. | भटक्या जमाती (क) |
| 23. | अनुसूचित जमाती | 58. | खुला |
| 24. | खुला | 59. | इतर मागास वर्ग |
| 25. | इतर मागास वर्ग | 60. | खुला |
| 26. | खुला | 61. | अनुसूचित जाती |
| 27. | अनुसूचित जाती | 62. | खुला |
| 28. | खुला | 63. | अनुसूचित जमाती |
| 29. | इतर मागास वर्ग | 64. | खुला |
| 30. | खुला | 65. | इतर मागास वर्ग |
| 31. | भटक्या जमाती (क) | 66. | खुला |
| 32. | खुला | 67. | अनुसूचित जाती |
| 33. | अनुसूचित जमाती | 68. | खुला |
| 34. | खुला | 69. | इतर मागास वर्ग |
| 35. | इतर मागास वर्ग | 70. | खुला |

मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/ अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,